महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय (विस्तार), दालन क्र.४३२,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-३२.
Email ID:- sm२.sesd-mh@gov.in

क्रमांक:-एसएफएस-१०२२/प्र.क्र.१२/एसएम-२ दिनांक:- २२ जून, २०२३

# मान्यता पत्र

प्रति,

अध्यक्ष / सचिव,
नारायणा एज्युकेशनल ट्रस्ट,
आय.सी. कॉलोनी, बोरीवली (प.),
मुंबई- ४०० १०३.

**विषय-** महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत स्वयं अर्थसहाय्यित तत्त्वावर नवीन शाळा सुरू करण्यासाठी किंवा विद्यमान शाळांचा दर्जावाढ करण्यासाठी मान्यता पत्र...

नारायणा एज्युकेशनल ट्रस्ट, मुंबई संचलित नारायणा ई-टेक्नो स्कूल, गट नं. ४२, कमलनयन बजाज हॉस्पिटल जवळ, सातारा परिसर, औरंगाबाद.

**संदर्भ-** इरादा पत्र क्रमांक एसएफएस-१०२२/प्र.क्र.१२/एसएम-२, दि. २१/०२/२०२२.

महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत नारायणा एज्युकेशनल ट्रस्ट, मुंबई संचलित नारायणा ई-टेक्नो स्कूल, गट नं. ४२, कमलनयन बजाज हॉस्पिटल जवळ, सातारा परिसर, औरंगाबाद या शाळेस (प्राथमिक ते उच्च माध्यमिक, इ.१ ली ते १२ वी, इंग्रजी माध्यम, सी.बी.एस.ई, सर्व शाखा) ही स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर नवीन शाळा सुरु करण्याकरिता अर्ज सादर केला होता.

२. आपल्या अर्जाच्या संदर्भात, महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ आणि महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) नियम, २०२० अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून नारायणा एज्युकेशनल ट्रस्ट, मुंबई संचलित नारायणा ई-टेक्नो स्कूल, गट नं. ४२, कमलनयन बजाज हॉस्पिटल जवळ, सातारा परिसर, औरंगाबाद या शाळेस (प्राथमिक ते उच्च माध्यमिक, इ.१ ली ते १२ वी, इंग्रजी माध्यम, सी.बी.एस.ई, सर्व शाखा) स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर शाळेचे बांधकाम सुरु करण्याकरिता, अटीं व शर्तीसह इरादा पत्र दिले होते. आता, शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून सदर नवीन शाळा सुरु करण्याची मान्यता, पुढील अटीं व शर्तींस अधीन राहून देण्यात येत आहे:-

३. अटी व शर्ती :-

१) प्रस्तावित शाळा, बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ आणि महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११ यांद्वारे निर्धारित केलेल्या सर्व मानकांची, अटींची व शर्तींची आणि या अधिनियमान्वये शासनाने दिलेल्या निदेशांची किंवा शासनाने, वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या मानकांची किंवा प्रमाणकांची किंवा अटींची आणि शर्तींची पूर्तता करील.

२) नोंदणीकृत संस्थेने किंवा न्यासाने किंवा कंपनीने, महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ याद्वारे निर्धारित केलेल्या सर्व मानकांचे, अटींचे व शर्तींचे आणि या अधिनियमान्वये शासनाने दिलेल्या निदेशांचे किंवा शासनाने, वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या मानकांचे किंवा अटींचे आणि शर्तींचे पालन करणे अनिवार्य आहे.

३) सी.बी.एस.ई. किंवा सी.आय.एस.सी.ई. किंवा सी.ए.आय.ई. किंवा आय.बी. इत्यादी मंडळाच्या संलग्नतेसाठी इच्छुक शाळा व्यवस्थापनांनी, शासनाने वेळोवेळी दिलेल्या निदेशांनुसार, शासनाकडून ना-हरकत प्रमाणपत्र घेणे अनिवार्य आहे.

४) शाळा व्यवस्थापन, शासनाने मंजूर केलेल्या शैक्षणिक वर्षाची सुरुवात करण्यापूर्वी संबंधित जिल्ह्याच्या शिक्षण अधिकाऱ्यास कळवील.

५) या अधिनियमाच्या तरतुदींअन्वये नवीन शाळेची स्थापना करण्यासाठी किंवा शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी दिलेली परवानगी, ती ज्या शैक्षणिक वर्षासाठी मंजूर केली आहे, त्याच वर्षासाठी असेल.

६) जर शाळा व्यवस्थापन, १८ महिन्यांच्या आत, शाळा सुरु करण्यास अपयशी ठरल्यास, दिलेले मान्यता पत्र रद्द होईल.

७) शाळा व्यवस्थापनास, मंजूर केलेले शिक्षणाचे माध्यम, शाळेचे ठिकाण, भविष्यात, शासनाच्या परवानगीशिवाय बदलता येणार नाही.

८) जर शाळा व्यवस्थापनाने, शासनाने मंजुरी दिलेल्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा स्थापन केली असेल तर, त्या शाळेची परवानगी रद्द होईल.

९) अशी तरतूद करण्यात आली आहे की, स्वयं अर्थसहाय्यित शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती शासनाच्या प्रचलित नियमांनुसार व विनियमांनुसार करण्यात यावी.

१०) जिल्हानिहाय माहिती भरतेवेळी, ज्या शाळेस परवानगी देण्यात आली आहे, ती शाळा, स्वतंत्र प्रवर्ग म्हणून "स्वयंअर्थसहाय्यित शाळा" अशी माहिती भरतील व यु.डी.आय.एस.इ. क्रमांक मिळवितील. यासंबंधात, राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांस, नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे.

११) शाळा व्यवस्थापन, शाळा परिसराच्या प्रवेशद्वारावर "स्वयंअर्थसहायित परवानगीप्राप्त शाळा" असा फलक लावतील.

१२) या अधिनियमाच्या कोणत्याही किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींचा भंग केल्याच्या किंवा अधिनियमान्वये दिलेल्या कोणत्याही निदेशांचे किंवा शासनाने वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या मानकांचे किंवा प्रमाणकांचे अथवा अटी व शर्तींचे अनुपालन करण्यात कसूर केल्याच्या कारणावरुन, कोणत्याही वेळी, राज्य शासन, दिलेले मान्यता पत्र रद्द करु शकेल.

प्रदिप पडोळे

(प्रदिप पडोळे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.

**प्रत माहितीसाठी -**

१. आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. राज्य प्रकल्प संचालक ,महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
३. संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे,
४. संचालक, (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे,
५. विभागीय शिक्षण उपसंचालक, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर,
६. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर.
७. निवडनस्ती एसएम-२/ (प्र.क्र.१२/२०२२)

**Maharashtra Government**

Department of School Education and Sports, Mantralaya (Extension), Hall No.432, Madam Cama Road, Hutatma Rajguru Chowk, Mumbai-32.
Email ID: sm2.sesd-mh@gov.in

No.:-SFS-1022/C.No.12/SM-2 Dated:- 22 June, 2023

Letter of approval

To,
The Chairman / Secretary, Narayana Educational Trust,
I.C. Colony, Borivali (W), Mumbai- 400 103.

**Subject**- Letter of approval for starting new schools or upgrading existing schools on self-financed basis under the Maharashtra Self-financed Schools (Establishment and Regulation) Act, 2012...

Narayana E-Techno School operated by Narayana Educational Trust, Mumbai, Gut No. 42, Near Kamalnayan Bajaj Hospital, Satara Parisar, Aurangabad.

**Reference**- Letter of Intent No. SFS-1022/C.No.12/SM-2, dtd. 21/02/2022.

Application was submitted under the Maharashtra Self-financed Schools (Establishment and Regulation) Act, 2012 for starting a new School on self-finance basis (primary to higher secondary 1st to 12th, std English Medium, CBSE, All Branch) by Narayana Educational Trust, Mumbai operated Narayana E-Techno School, Gut no. 42, Near Kamalnayan Bajaj Hospital, Satara Parisar, Aurangabad.

2. With reference to your application, a letter of intent was issued with certain terms and conditions for starting construction of Narayana Educational Trust, Mumbai operated, Narayana E- Techno School (primary to higher secondary 1st to 12th, std English Medium, CBSE, All Branch) at Gut no. 42, Near Kamalnayan Bajaj Hospital, Satara Parisar, Aurangabad from the academic year 2023-24 under the Maharashtra Self-Financed Schools (Establishment and Regulation) Act, 2012 and the Maharashtra Self-Financed Schools (Establishment and Regulation) Rules, 2020. Now, approval to start the said new school from the academic year 2023-24 is granted subject to the following terms and conditions:-

3. **Terms and Conditions :-**

1)The proposed school complies with all the standards, terms and conditions prescribed by the Right of Children to Free and Compulsory Education Act, 2009 and the Maharashtra Right to Free and Compulsory Education Rules, 2011 and the directions issued by the Government under this Act or the standards or standards specified by the Government from time to time or Terms and conditions will be fulfilled.

2)It is mandatory for the registered organization or trust or company to comply with all the standards, terms and conditions prescribed by the Maharashtra Self

Financed Schools (Establishment and Regulation) Act, 2012 and the directions issued by the Government under this Act or the standards or terms and conditions specified by the Government from time to time.

3) It is mandatory for the school managements who are interested in the affiliation of the CBSE or CISCE or C.A.I.E. or I.B. etc. board, to obtain a no-objection certificate from the government as per the instructions issued by the government from time to time.

4)The school management shall inform the Education Officer of the concerned district before the commencement of the academic year as approved by the Government.

5)Permission granted under the provisions of this Act to establish a new school or upgrade a school shall be for the academic year for which it is granted.

6)If the school management, fails to start the school within 18 months, the approval letter issued shall stand cancelled.

7)The school management, approved medium of education,location of the school shall not be changed in future without the permission of the Government.

8)If the school management establishes a school at a place other than the place approved by the Government, the permission of that school shall be cancelled.

9)It has been provided that the recruitment of teachers and non- teaching staff in self-financed schools should be done in accordance with the prevailing rules and regulations of the Government.

10)While filling district wise information, the school to which permission has been given shall fill the information as "Self- financed School" as a separate category and obtain UDISE number. In this regard, the State Project Director, Maharashtra Primary Education Council, Mumbai, has been declared as the Nodal Officer.

11)The school management shall put up a signboard at the entrance of the school premises saying, "Self-Supporting Permitted School".

12)The State Government may, at any time, cancel the letter of approval on the ground of breach of any of the provisions of this Act or the rules made thereunder or failure to comply with any directions issued under the Act or standards or terms and conditions specified by the Government from time to time.

Attested
Zbagwan 28/6/2024
ADV. ZULPHEKHAR A. SATTAR BAGWAN
NOTARY GOVT. OF INDIA
Aurangabad Dist.
Regd. No. 11132

SD/-
(Pradip Padole)
Desk Officer, Government of Maharashtra.

Adv. Zulphekhar S. Bagwan
Notary, Govt. of India
Aurangabad Dist
Reg. No. 11132

**Copy for information -**

1. Commissioner, Education, Maharashtra State, Pune.
2. State Project Director, Maharashtra Council of Primary Education, Mumbai.
3. Director, (Secondary & Higher Secondary), Maharashtra State, Pune,
4. Director, (Primary), Maharashtra State, Pune,
5. Divisional Deputy Director of Education, Chhatrapati Sambhajinagar Division, Chhatrapati Sambhajinagar,
6. Education Officer (Primary/Secondary), Zilla Parishad, Chhatrapati Sambhajinagar.
7. Record file SM-2/ (C.No.12/2022)